महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका - २०१७
प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र


क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१६ /का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- ०३ डिसेंबर, २०१६

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त

विषय :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१७
प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष, दि. २७/०५/२०१५
२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४/का.५ दि. ०९/०३/२०१६

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने संबंधित महानगरपालिका आयुक्त व पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची आहे.

२. शासनाने दि.३० ऑगस्ट, २०१६ रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार सर्व महानगरपालिका निवडणुकांकरिता ( बृहन्मुंबई वगळून ) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. यामुळे प्रत्येक मतदाराला सरासरी ४ मते द्यावी लागणार आहेत.

३. ही बाब लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त दि. २७ मे, २००५ च्या आदेशामध्ये पुढीलप्रमाणे अंशत: सुधारणा करण्यात येत आहे :-

कृ.मा.प./-

| अ.क्र. | महानगरपालिका | मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका<br>(प्रत्येक मतदार -१मत ) | १२०० ते १४०० मतदार प्रती मतदान केंद्र |
| २ | इतर सर्व महानगरपालिका<br>(प्रत्येक मतदार - सरासरी ४ मते) | ७५० ते ८०० मतदार प्रती मतदान केंद्र |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र